दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १६८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१८ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## उद्धव ठाकरेंचा शंखनाद, भदसरा मेळावा शिवतीर्थावरच होणार'

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईत शिवाजीपार्कवर म्हणजेच शिवतीर्थावर दसरा मेळावा कोणाचा होणार? यावरून राजकारण तापलं आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पदाधिकाऱ्यांची बैठक घेत दसरा मेळाव्यासाठी शंखनाद केला आहे. शिवतीर्थावर दसरा मेळावा आपलाच होणार आहे. यासाठी तातडीने कामाला लागा, अशा थेट सूचना उद्धव ठाकरे यांनी बैठकीत दिल्या आहेत.

शिवसेना भवनात आज उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेनेचे विभाग प्रमुख आणि उपविभाग प्रमुखांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्याच्या तयारीसंदर्भात आणि नेत्यांना महत्त्वाच्या सूचना करत आदेशही दिले. शिवतीर्थावर दसरा मेळावा शिवसेनेचाच होणार आहे. यामुळे मनात कोणताही संभ्रम ठेवू नका. महिला आघाडी, युवा सेना, शिवसैनिकांनासोबत घ्या, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले.

# जे शिवसेनेचे होऊ शकले नाहीत ते जनतेचे काय होणार? : आदित्य ठाकरे

**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

जे ४० गद्दार शिवसेनेचे, उद्धव ठाकरेंचे, महाराष्ट्राचे होऊ शकले नाहीत ते जनतेचे काय होणार? या गद्दारांना मातीत गाडा असे आवाहन युवासेना प्रमुख अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी रत्नागिरीतील शिवसंवाद यात्रेत केले. शिवसंवाद यात्रेनिमित्त रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आले होते.

ते पुढे म्हणाले की, गद्दारांची वृत्ती महाराष्ट्राला विकासापासून मागे खेचत आहे. त्यांचे शिवसेना फोडण्याचेही प्रयत्न सुरू आहे. ज्यावेळी शिवसेना फुटेल तेव्हा महाराष्ट्राचे पाच तुकडे होतील. सध्या ठाकरे परिवाराला एकटे पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा गंभीर आरोप करीत त्यांनी उपस्थित शिवसैनिक, जनतेला तुम्ही आमच्याबरोबर आहात तर तुम्ही हात उंचावून प्रेम आणि आशीर्वाद द्या, अशी भावनिक साद घातली.

स्थानिक आमदारांनी गद्दारी केली ती योग्य की अयोग्य? महाराष्ट्रात जे घाणेरडे राजकारण



चालले आहे ते जनतेला पटणारे आहे का, हे मी येथील जनतेला विचारायला आलो आहे. मात्र, या ४० गद्दारांचे आम्हाला गद्दार म्हणून नका तर विश्वासघातकी म्हणा, असे निरोप येऊ लागले आहेत.

आज तेच ४० आमदार स्वत:ला खोके आणि महाराष्ट्राला धोके, असे काम करत असून त्यांनी आजपर्यंतच्या अडीच महिन्यांच्या कालावधीत एक तरी काम राज्याच्या हिताचे केले आहे का, ते दाखवून द्यावे असे आव्हान त्यांनी दिले.

वेदांता फॉक्सकॉन हा प्रकल्प सुमारे दीड लाख कोटीची गुंतवणूक आणि एक लाख युवकांना रोजगार देणारा प्रकल्प गुजरात येथे नेण्यात आला. याच प्रकल्पासाठी त्यावेळचे उद्योगमंत्री सुभाष देसाई आणि आपण जून महिन्यापर्यंत पाठपुरावा करत होतो. मात्र, आताच्या सरकारच्या नाकर्तेपणामुळे हा प्रकल्प केंद्र सरकारने गुजरातला पळवला. त्यामुळे एक लाख युवकांचा रोजगारही हिरावला, असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी शिवसेना नेते आमदार भास्कर जाधव, माजी खासदार अनंत गिते, आमदार राजन साळवी, जिल्हाध्यक्ष विलास चाळके, सहसंपर्कप्रमुख राजेंद्र महाडिक, मुंबईच्या माजी महापौर श्रद्धा जाधव, उदय बने, प्रमोद शेरे, तालुकाप्रमुख बंड्या साळवी व अन्य नेते उपस्थित होते.

# केंद्र व राज्य सरकारच्या जन विरोधी धोरणांच्या विरोधात दि २१ सप्टेंबर रोजी उरण तहसील कार्यालयावर मोर्चा

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र शासनाने लागू केलेल्या विविध धो–रणाचा, निर्णयाचा निषेध करण्यासाठी व हे ध्येयधोरणे पाठीमागे घ्यावेत यासाठी सी आय टी यु,अखिल भारतीय किसान सभा,अखिल भारतीय जनवादी महिला संघटना व डी वाय एफ आय या संघटनेच्या माध्यमातून बुधवार दिनांक २१ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता उरण तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. उरण चारफाटा येथे सकाळी १०:३० वा पदाधिकारी कार्यकर्ते एकत्र जमणार आहेत व चारफाटा येथून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

महागाई कमी करण्यासाठी पेट्रोल, डिझेल व गॅस वरील वाढविलेले सेस व सरचार्ज तात्काळ रद्द करा, अनुदान पुर्ववत लागू करा. सर्व दर ५०% कमी करा.रेशन व्यवस्था मोडित काढण्याची सरकारी मोहिम बंद करा. (स्वच्छेने अन्नधान्याचा लाभ सोडावा ही शासनाने जाहीर योजना मागे घ्या.) प्रती वर्षी ५ लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या सर्वांना स्वस्त धान्य रेशन द्या. शहरी व ग्रामीण, सुशिक्षित व अशिक्षित सर्वांसाठी योग्य रोजगार देणारी रोजगार हमी योजना सुरु करा. सरकारी व निमसरकारी सेवा व संस्थांमधील रिक्त जागा तात्काळ भरा. बँका, विमा, वित्त संस्था तसेच अन्य सर्व सरकारी संस्थांचे खाजगीकरण करण्याच्या योजना मागे घ्या. शेतकऱ्यांना दुधासहीत सर्व उत्पादनांवर योग्य हमीभाव देण्यासाठी केंद्रीय पातळीवर कायदा करा. केंद्र सरकारचे कामगार विरोधी कायदे तात्काळ मागे घ्या. विरोधक, पत्रकार, लेखक, कार्यकर्ते यांच्यावर लावलेले खोटे खटले आणि बनावट आरोप तात्काळ मागे घेवून घटनात्मक लोकशाही हक्काची हमी द्या. दलित, आदिवासी आणि अल्पसंख्यांकांविरोधात द्वेष पसरविणाऱ्या आणि हिंसक हल्ले करणाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर निर्णायक कायदेशीर कारवाई करा. महाराष्ट्र वीज कंपनी करत अस–लेली सातत्याची दरवाढ मागे घ्या. नादुरुस्त रस्ते तातडीने दुरुस्त करा. उरण–पनवेल रस्त्यावरील सिडको ऑफीसजवळील फुंडा स्टॉपजवळील ब्रिजचे नवीन

.../२

# महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते हायमास्ट दिव्यांचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा काँग्रेस पक्षाचे प्रतोद बाजीराव परदेशी यांनी रायगड जिल्हा परिषद निधीतून ऐतिहासिक प्रसिध्द चिरनेर गावातील नाक्यावर तसेच मोठे भोम नाक्यावर बसविण्यात आलेल्या हायमास दिव्यांचे उध्दघाटन काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांनी गौरा गणपती मंडळाना भेट देऊन श्री गणेशाचे दर्शन घेतले. चिरनेर या गा–वात लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री महागणपतीचे स्वयंभू स्थान आहे.तसेच १९३० साली ब्रिटीश सरकारच्या विरोधात चिरनेर परिसरातील जनतेने लढा उभारला होता. त्यामुळे या गावाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.अशा ऐतिहासिक प्रसिध्द गावात हजारोंच्या संख्येने भाविक,पर्यटक नागरीक ये–जा करत असतात.या गावाचे सुपुत्र तथा रायगड जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी यांनी गावाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या विकास निधीतून उभारण्यात येत असलेल्या हायमास दिव्यातून चिरनेर गाव उजळून निघणार आहे.त्यामुळे बाजीराव परदेशी या लोकसेवकांचा निश्चित चिरनेर गावातील लोकांना अभिमान वाटणार आहे.असे गौरव उद्गार महेंद्र घरत यांनी याप्रसंगी काढले.

यावेळी चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष चिर्लेकर, काँग्रेस पक्षाचे तालुका युवा अध्यक्ष राजेंद्र भगत, जेष्ठ नेते बापू मोकल, काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष घनश्याम पाटील, तिरंगा पत पेढीचे चेअरमन अलंकार परदेशी, रविंद्र भगत,अमित नारंगीकर, संतोष भगत, चंद्रकांत गोंधळी,जीवन नारंगीकर, जेष्ठ नागरिक कमळाकर म्हात्रे, गणेश म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य किरण कुंभार, विकास म्हात्रे, किशोर केणी सह चिरनेर,मोठे भोम गावातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विरोधकांचा असंतुष्ट आत्मा म्हणजे विकृतीची प्रवृत्ती आहे : खा.सुनील तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

आघाडी सरकारच्या माध्यमातून नेवरूळ गावात ९० लक्ष रुपये खर्चाचे विकास कामे करण्यात आली आहेत याचे मनस्वी समाधान आहे परंतु नळपाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन करण्याचे कार्यक्रमाला येत असताना मला सांगण्यात आले कार्यक्रम घेऊ नका असे सांगणाऱ्या लोकांचा आत्मा हा असंतुष्ट असून त्यांची प्रवृत्ती ही विकृतीची आहे असा टोला खासदार सुनिल तटकरे यांनी विरोधकांना लगावला.



अधिकपणे बोलताना सांगितले की अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणी योजना जळजीवन मिशन योजनेच्या अंतर्गत समाविष्ट करून तालुक्यातील सर्व गावांच्या पाणी योजना नव्याने करण्यासाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मंत्रिमंडळात स्थान असलेल्या माजी पालकमंत्री श्रीवर्धनच्या आमदार आदिती तटकरे यांचे नेतृत्वाखाली मंजुरी देण्यात आली आहे या कामांचे श्रेय दुसरे कोणी घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये. गावात पाण्याची टाकी बांधण्यासाठी जी जागा देण्यात येणार आहे त्याकामी कोणीही अडवणूक करू नये अशी विनंती करताना पितृपक्षात एखादे शुभ काम करणे म्हणजे सामजिक शुभसंकेत आहेत असे मी मानतो असेही खासदार तटकरे यांनी सांगितले.

माझ्या राजकीय व सामाजिक जीवनात मला कितीजण आड गेले असले तरी अशा अनेकांना पार करून माझे सामाजिक काम अविरतपणे करीत असल्याचेही खासदार सुनिल तटकरे यांनी आवर्जून सांगितले.कार्यक्रमाला खासदार सुनिल तटकरे यांचे समावेत तालुका जेष्ठ नेते अलिशेठ कौचाली,जिल्हा चिटणीस महादेव पाटील,

.../२

# आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते २५० बौद्धिक दिव्यांग मुलांना शैक्षणिक साहित्याचे किट वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, (दिव्यांगजन) क्षेत्रीय केंद्र खारघरमध्ये आज (दि. १७ सप्टेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्ताने २५० बौद्धिक दिव्यांग मुलांना शैक्षणिक साहित्याचे ( किट) वाटप करण्यात आले.

सेवा पंधरवडा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ या दरम्यान संपूर्ण देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७२ वा वाढदिवस साजरा होत आहे. या शुभप्रसंगाचे औचित्य साधुन संपूर्ण देशभरात ७२ ठिकाणी सामाजिक अधिकारिता शिबिरांचे आयोजन केलेले होते. या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी या सर्व शिबिरांमध्ये ऑनलाईन माध्यमाने थेट उपस्थित होते. सामाजिक न्याय अधिकारिता मंत्रालयाचे डॉ .वीरेंद्र कुमार याच्या मार्गदर्शनाखाली या सर्व ७२ ठिकाणी शिबिरांमध्ये आयोजन करण्यात आले होते. या




कार्यक्रमासाठी पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर, आयुष मंत्रालय मुंबई होमिओपॅथी अनुसंधान प्रभारी अधिकारी डॉ. रमेश बावसकर, विशेष शिक्षण व्याख्या डॉ. गायत्री अहुजा, अली यावर जंग राष्ट्रीय वाक् एवं श्रवण दिव्यांगजन संस्थान, मुंबई आणि डॉ. रवी प्रकाश सिंग प्रभारी

.../२

# मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त युवक काँग्रेसच्या वतीने पनवेल येथे बेरोजगारी दिवस साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने दि १७ सप्टेंबर २०२२ रोजी पनवेल काँग्रेस भवन येथील रस्त्यावर राष्ट्रीय बेरोजगारी दिवस (National Unemployment Day) केक कापून व पकोडे तळून पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे यांच्या नेतृत्वात साजरा करण्यात आला.

मागील ८ वर्ष पंतप्रधान मोदी यांच्या चुकीच्या निर्णयामुळे त्या मध्ये नोटबंदी, अस्थिर GST, कोविद मध्ये लावलेले उशिरा लॉकडाउन अशा अनेक निर्णयांमुळे बेरोजगारी व महागाई वाढली आहे असे म्हात्रे या वेळी म्हणाले. यावेळी महाराष्ट्र



प्रदेश युवक काँग्रेस सचिव विश्वजीत पाटील, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मलाताई म्हात्रे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष नौफील सय्यद व युवक काँग्रेसचे युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अभिजीत मुंडक्कल,

.../२

# महापालिकेच्या खारघर, कळंबोली, पनवेलमधील'स्वच्छ अमृत महोत्सवाच्या भव्य रॅलीला तरुणांचा उदंड प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र शासनामार्फत 'स्वच्छ अमृत महोत्सवानिमित्ताने' खारघरमध्ये सायकल रॅली, कळंबोली, पनवेलमध्ये पदयात्रा आणि स्वच्छता मोहिमेचे आयोजन महापालिकेच्यावतीने करण्यात आले होते. पनवेल महापालिका मुख्यालय ते वडाळे तलाव पदयात्रेस आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त श्री गणेश देशमुख,माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे,पनवेलमधील प्रसिध्द आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष,उपायुक्त सचिन पवार, लेखा परिक्षक निलेश नलावडे,सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव विधाते, माजी नगरसेवक,नगर सेविका उपस्थित होत्या.



केंद्र शासनामार्फत 'स्वच्छ अमृत महोत्सव' १७सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान पनवेल महापालिका क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत 'इंडियन स्वच्छता लीग'स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

.../२

# संक्षिप्त...

## राज्य उत्पादन शुल्क, पनवेल शहर यांच्यातर्फे कारवाईला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य उत्पादन शुल्क, पनवेल शहर यांनी डिसेंबर २०२१ ते ऑगस्ट २०२२ पर्यंत अवैध मद्य, मद्य वाहतूक, बेकायदेशीर मद्य विक्री करणरयावर १६२ गुन्ह्यांची नोंद केली आहे. याप्रकरणी २२ लाख ७७ हजार १२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामध्ये अवैध दारू वाहतूक करणारे एकूण बारा वाहने जप्त करण्यात आली आहेत. तसेच अनुज्ञप्तीवर विभागीय विसंगतीचे एकूण २८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

पनवेल परिसराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकीकरण देखील झपाट्याने वाढू लागले आहे. पार्टी, समारंभ, मेजवानी, लग्न समारंभ मध्ये मोठ्या प्रमाणात मद्य पुरविले जाते. यावेळी मद्यपान करणाऱ्याचे प्रमाण देखील भरमसाठ आहे. अशा वेळेला बनावट मद्याचा देखील पुरवठा केला जातो. परराज्यातून मोठ्या प्रमाणावर बेकायदा मद्य शहरात आणले जाते. या विरोधात उत्पादन शुल्क विभागाने कठोर कारवाईचा बडगा उगारला असून बेकायदेशीर मद्य व रसायन विकणाऱ्या विक्रेत्यांवर देखील कारवाई केली आहे. उघडयावर मदय पिणाऱ्या मद्यपीवर व ढाबा मालकावर गुन्हे नोंद करत त्यांना शिक्षा देखील न्यायालयाने दिली आहे. सध्याच्या विधिमंडळात गाजलेल्या बियर शॉप समोर उघडपणे बियर पिणाऱ्या मद्यपी तसेच बिअर शॉप मालक यांच्यावर गुन्हे नोंद करत त्यामधील एकूण सात बियर शॉपी या जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने बंद करण्यात आलेल्या आहेत. अपुरे कर्मचाऱ्याअभावी देखील राज्य उत्पादन शुल्क पनवेल विभागाची कारवाईची मोहीम सुरू आहे. नागरिकांना अवैध धंद्याबाबत काही तक्रारी असल्यास त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभाग, निरीक्षक पनवेल शहर यांच्या कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.


**सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**दैनिक रायगड नगरी**
**9619979706 / 9619737911**



**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# स्वच्छ सागर..सुरक्षित सागर मोहिमेस रायगडकरांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आपण आपले घर आणि आजूबाजूचा परिसर जसे स्वच्छ ठेवतो तसेच आपला सागर किनाराही स्वच्छ ठेवण्याच्या संकल्पाने प्रेरित होऊन समस्त रायगडकरांनी आणि रायगड जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज विविध सागर किनार्यांवर स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहीम उत्साहाने राबविली.



जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन या तालुक्यातील मुरुड, काशिद, अलिबाग, आवास, किहीम, थळ, वरसोली, आक्षी, नागाव, रेवदंडा, श्रीवर्धन, दिवेआगार, हरिहरेश्वर, आरावी या समुद्रकिनाऱ्यांवर आज एकाच वेळी हा उपक्रम राबविण्यात आला. विविध सागरी किनाऱ्यावर आयोजित या उपक्रमाच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, महसूल विभागाचे सहसचिव अजित देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, स्नेहा उबाळे, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, अमित शेडगे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, राजेंद्र भालेराव, शुभांगी नाखले, पोलीस उप अधीक्षक जगदीश काकडे, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, तहसिलदार मीनल दळवी, सचिन गोसावी, मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, रोहन शिंदे, विराज लबडे, मनोज उकिर्डे, पंकज भुसे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, सीडीपीओ गीतांजली पाटील, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे जयवंत गायकवाड, संबंधित गटविकास अधिकारी, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी, विस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सागरी सीमा मंचचे रघुजीराजे आंग्रे, वरसोली ग्रामपंचायत सरपंच प्रमिला भाटकर, माणुसकी प्रतिष्ठानचे डॉ.राजाराम हुलवान, सुशील साईकर, रोटरी क्लब, लायन्स क्लब या व इतर स्वयंसेवी संस्था, दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महेश पिळणकर व इतर पदाधिकारी, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

केंद्र शासनाचे पृथ्वी मंत्रालय व रायगड जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. सागरी जीवन हा देखील मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असून त्याची स्वच्छता राखणे, ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. या भावनेतूनच समुद्र किनारा स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यासाठी स्थानिक जनतेने अभूतपूर्व सहकार्य केले. जिल्हा प्रशासनातर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्ह्यातील स्वच्छ सागर सुरक्षित सागर हे अभियान मुरुड, काशिद, अलिबाग, आवास, किहीम, थळ, वरसोली, आक्षी, नागाव, रेवदंडा, श्रीवर्धन, दिवेआगार, हरिहरेश्वर, आरावी या समुद्रकिनाऱ्यांवर संपन्न झाले. सागरी किनाऱ्यावरील कचरा संकलनासाठी शाळा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरीक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे सागर किनाऱ्यांची स्वच्छता ही एक लोकचळवळ बनणार आहे. रायगडकरांचा या उपक्रमास उदंड प्रतिसाद मिळाला आहे. जलचक्र पाहिल्यास जैविक सृष्टी ७० टक्के पाण्यात असून यात उत्पादक इकोसिस्टीमचाही समावेश आहे. सध्याच्या काळात वातावरण बदलाचा आपण अनुभव घेतोय. घराबरोबरच बाहेरील परिसर स्वच्छ न ठेवल्यास त्याचे दुष्परिणाम सर्व जैविक सृष्टीला निश्चितच भोगावे लागतील. मानवनिर्मित कचऱ्यामुळे सूक्ष्म जीवापासून ते महाकाय जीवांनाही त्रास होत असल्याचे सिद्ध होत आहे. सागर परिसंस्थेतही मानव जातीकडून कळत-नकळत प्रदूषण केले जात आहे. त्याचबरोबर प्लास्टिकचे विघटन होत नसल्याने त्यातील सूक्ष्म घटक निसर्गाला, मानवाला घातक आहेत. सर्वांनीच प्लास्टिकचा वापर शक्य तितका कमी करण्याचा संकल्प करायला हवा. रासायनिक खतांचा वापरही टाळायला हवा, सर्वत्र स्वच्छता राखायला हवी, असे आवाहन या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाकडून सर्वांना करण्यात आले.

# पोस्को कंपनीतर्फे वनवासी कल्याण आश्रम शाळेस वॉशिंग मशीन आणि ड्रायरची मदत

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

पॉस्को महाराष्ट्र स्टीलने आपल्या सी.एस.आर. उपक्रमांतर्गत वनवासी कल्याण आश्रम शाळा माणगांवच्या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसाठी दि. १६ सप्टेंबर २०२२ रोजी कमर्सिअल वॉशिंग मशीन आणि ड्रायरचे दोन संच भेट स्वरूपात दिले. वनवासी कल्याण आश्रम शाळा हि एक सेवाभावी संस्था आहे,




वनवासींच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतीक विकासासाठी समाजाच्या दानशूर दात्यांच्या माध्यमातून संस्था अविरत सेवा करत आहे. या आश्रम शाळेतील प्राथमिक विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कपडे धुण्यासाठी अडचणी येत होत्या कारण ही मुले स्वत:चे कपडे स्वत: धुण्यासाठी खूप लहान आहेत, त्यामुळे त्यांचे कपडे इयत्ता आठवी ते दहावीचे विद्यार्थी धूत होते. विद्यार्थ्यांचे हे कामाचे ओझे कमी करणे आणि त्यांना अधिकाधिक वेळ हा अभ्यासासाठी मिळावा या प्राथमिक उद्देशाने मशीन्स भेट दिल्या.

या मशीन्समुळे आता विद्यार्थ्यांना त्यांचे कपडे धुणे सोपे होणार आहे. कंपनीने केलेल्या मदतीबद्दल शाळेचे व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. नजीकच्या काळात पोस्को कंपनीचा या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अन्य सुविधाही उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

या प्रसंगी पोस्को मॅनेजमेंट टीम म्हणाली, आम्हाला आनंद आहे की या उपक्रमामुळे आम्ही या निवासी शाळेत राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणू शकलो. एक कंपनी म्हणून आम्ही अशा प्रकारच्या उपक्रमांद्वारे समाजाच्या सामाजिक विकासासाठी योगदान देण्यावर नेहमीच लक्ष केंद्रित करू. असे नेहमी आश्वासन देणाऱ्या पॉस्को कंपनीने तालुक्यातील परिसरात केलेल्या आजवरच्या मदत कार्यातुन आपले वचन सिध्द केले आहे.

# शिवसेना पनवेल जिल्हा व रामदास शेवाळे प्रतिष्ठान मार्फत चालक दिन साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पनवेल जिल्हा व रामदास शेवाळे प्रतिष्ठान मार्फत ता.१७ रोजी बिमा कॉम्प्लेक्स या ठिकाणी चालक दिन साजरा करण्यात आला.

देशातील दळणवळण व परिवहन क्षेत्रातील वाहनचालक हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यांच्या योगदानाबद्दल चालकांचा उचित सन्मान करण्याच्या उद्देशाने १७ सप्टेंबर हा दिवस चालक दिन म्हणून साजरा केला जात जातो त्या अनुषंगाने कळंबोली स्थित आशिया खंडातील सर्वात मोठ्या लोखंड बाजारात माल वाहतूक करण्यास येणार्या वाहन चालकांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

शिवसेना पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात पनवेलचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन ठोंबरे ,मोटर वाहन निरिक्षक चंद्रकांत माने, संजय पाटील, स्वप्नील नेवसे, कळंबोली वाहतूकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निशिकांत विश्वकर, पीएसआय साळुंखे उपस्थित होते.

या वेळी आर टी ओ अधिकारी गजानन ठोंबरे यांनी चालकांना मार्गदर्शन केले. तर निशिकांत विश्वकार यांनी वाहतुकच्या नियमांचे पालन कसे करावे या विषयी मार्गदर्शन केले.

वाहतुकदार तुकाराम सरक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले तर रामदास शेवाळे प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्रीकांत फाळके यांनी ऊपस्थितांचे आभर मानले.

# रोह्यात शिंदेची सेना आघाडीवर ; पालेखुर्द वाडीचा शिंदे गटात जाहिर प्रवेश

**दै.रायगड नगरी । धाटाव**

महाराष्ट्राच्या राजकारणात एकनाथ शिंदे गटामुळे मोठी उलथापालथ झाली. यामुळे, मुळ शिवसेना तोंडघशिच पडली. तर स्थानिक राजकारण्याची तर या उलथापालथीमुळे हवाच निघुन गेली आहे. रायगडच्या तिनही आमदारांनी एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्विकारल्याने आज ते आमदार असल्याने त्यांची ताकद मोठी पडत आहे. या आमदारांचा रोहा तालुक्यात झंजावत सुरु असुन कोलाड जवळील पाले खुर्द आदिवासी वाडीतील ग्रामास्थनी शिंदे गटाचे नेतृत्व स्विकारीत आमदार भरतशेठ गोगावले व आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत जाहिर पक्षात प्रवेश केला व लवकरच पाले खुर्द गावतील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात शिंदे गटाचे नेतृत्व स्वीकारणार असल्याचे सांगण्यात आले.

मागिल महाविकास आघाडीमधे रायगडातिल शिवसेना व राष्ट्रवादीचे फारसे जमले नाही. यामधे हुशार राष्ट्रवादीने विकासाच्या बाबतीत चांगलेच हात धूऊन घेतले. अखेर राष्ट्रवादीशी पटत नाही हे कारण सांगत महाविकास आघाडी सरकार शिंदे गटाने



कोसळवले.

यामुळे रायगडातील राजकारण बदलून गेले. रायगडात शिवसेना व राष्ट्रवादी आज सत्तेत नाहित.सध्या सरकार शिंदे गट व भाजपाचे असल्याने त्या गटाचे सध्या तिन आमदार शेट जोशात आहेत. व पक्ष प्रवेशाचा सिलसिला सुरु आहे. आमदारच शिंदे गटात गेल्याने रोह्यतील शिवसेना कमकुवत झाली. तालुका प्रमुख समीर शेडगे व काही कार्यकर्ते अद्याप शिवसेनेशी ठाम असले तरी शिवसेना वाचवताना दिसत नाहित. त्यामूळे एकनाथ शिंदे गटाचे नेतृत स्वीकारलेले मनोजकुमार शिंदे सध्या भलतेच फार्मात असल्याचे दिसत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गट रोहा तालुक्यात सक्रिय होताना दिसत आहे. त्यामुळे शिंदे गटाचा उधळलेला वारू सेना रोखू शकेल का?हे आगामी येणारा काळ ठरवेल.

सेनेत पडलेले दोन गट, शेकाप व राष्ट्रवादीचे बिनसलेले राजकारण तरीदेखिल दोन मुलांच्या अधारावर सुनिल तटकरे यानी पक्षाची बांधलेली मजबूत तटबंदी. यामुळे आगामी निवडणुकीचे चित्र वेगळे असनार आहे. एवढे मात्र निचित. मात्र सध्याचा पुढचा काल हा रायगडात शिंदे गटाच्या आमदारांचा असनार आहे त्यामूळे सत्तेचा फायदा उठवीत उरली सुरलेली सेना शिंदे गट संपविणार का ? राष्ट्रवादीशी देखील राजकारनात दोन हात करनार का? याकडे लक्ष लागले आहे. तर पालेखुर्द आदिवासी बांधवांचे आमदार भरतशेट गोगावले यांनी स्वागत करित पक्षात तुम्हाला योग्य न्याय दिला जाईल असे अभिवचन दिले.

# स्वच्छ सागर सुरक्षित सागर अभियानांतर्गत काशिद बीच चकाचक

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने स्वच्छ सागर सुरक्षित सागर अभियानांतर्गत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसीलदार रोहन शिंदे, नायब तहसीलदार रवींद्र सानप यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड तहसील व काशिद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहिम राबविण्यात येऊन काशिद-बिच समुद्रकिनारा चकाचक करण्यात आला !

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने व कोस्टल डे औचित्याने संपूर्ण जिल्ह्यात ठिकठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात येत असून मुरुड तालुक्यातील मुरुड, काशिद बीच, नांदगाव, मुरुड व राजपूरी समुद्रकिनारी उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.मुरुड तहसील व काशिद ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेत मुरुड महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, गटशिक्षणाधिकारी बी.के.पाखरे, महेश भगत, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका प्रियंका भोईर, ग्रामपंचायत सरपंच नम्रता कासार-खेडेकर, सदस्य संतोष राणे, सुनील दिवेकर, विलास दिवेकर, सरोज दिवेकर, ग्रामसेवक सुशांत ठाकूर, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गंभे,रा.जि.प.प्राथमिक शाळा मुख्याध्यापक प्रकाश नांदगावकर, शिक्षक वृंद, विद्यार्थी,सागरी सीमा मंच आशिष बुल्लू, काशिद बीच समुद्रकिनाऱ्यावरील स्टॉल धारक, सुर्यकांत जंगम प्रशांत खेडेकर कर्मचारी वृंद व ग्रामस्थ या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. यावेळी काशिद बीच समुद्रकिनाऱ्यावरील रिकाम्या प्लॅस्टिक बाटल्या,जाळी आदी.२५०० किलो कचरा गोळा करण्यात येऊन त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.



# श्रीवरदायिनी विद्यालय, कापडे बुद्रुक येथील सीईटी मार्गदर्शन केंद्राचे स्नेहल जगताप यांच्या हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील एचएससी परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेताना आवश्यक असलेल्या सीईटी मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन रविवार, दि. १८ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांच्याहस्ते श्रीवरदायिनी विद्यालय, कापडे बुद्रुक येथे होणार असल्याची माहिती रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष सिताराम दौ.सकपाळ यांनी येथे दिली.

पोलादपूर तालुक्यातील पहिल्या सीईटी मार्गदर्शन केंद्राच्या उदघाटनप्रसंगी रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष हनुमंत जगताप, महेंद्र पाटेकर, प्रभाकर महामुणकर, रजनी सावंत, सोपान चाळके, रामचंद्र देशमुख, दयाराम कालगुडे, संजय मेहता, डॉ.चेतन सुर्वे, मंगला महाडीक, शहाजी देशमुख असे रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी सीईटी मार्गदर्शन केंद्राचे मार्गदर्शक पुणे येथील आशिष आगाशे आणि सौरभ काठवठे हेदेखील उपस्थित राहणार असल्याची माहिती यावेळी उपाध्यक्ष सिताराम दौ. सकपाळ यांनी दिली.

---

**अर्जदारातर्फे वकील : ॲड.डी.वाय.बैकर**

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो.रायगड यांचे कोर्टात
एम.ए.सी.पी.क्र.१३४/२०१८
नि.नं.२३/ड
ने.ता.१४/१०/२०२२

सरिता संतोष जुईकर वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
मे.व्ही.एम.गॅस सर्व्हीसेस तर्फे
कल्पना नितीन नाचने वगैरे १ — सामनेवाला

प्रति,
मे.व्ही.एम.गॅस सर्व्हीसेस तर्फे
कल्पना नितीन नाचने
पत्ता : शॉप नं.१४, स्वरगंधा को.ऑप.हौ.सोसा.लि.,
श्रीनगर, वागळे ईस्टेट (प) ठाणे ४००६०४

अर्जदार यांनी तुमचे विरुद्ध या न्यायालयात दि.०७/०४/२०१८ रोजीचे मोटार अपघाताबाबत रु.४५,००,०००/- मात्र नुकसान भरपाई मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. अपघात तारेखस तुम्ही सा.वाला क्र.१ हे अपघातातील ट्रक क्र.एमएच-०४-एचडी-६४२६ चे मालक आहात तुम्हांस अर्जाची वेळोवेळी समन्स काढून देखील तुमचेवर समन्सची बजावणी होवू शकली नाही. तुमच्या इन्शुरन्स पॉलिसीमध्ये देखील वर प्रमाणे नाव व पत्ता दिला आहे.

तरी तुम्हास या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, तुम्ही स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत दि.१४/१०/२०२२ रोजी या न्यायालयात ठिक सकाळी ११.०० वाजता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१५ माहे ०९ सन २०२२ रोजी आपल्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>जिल्हा न्यायालय<br>रायगड-अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>अधिक्षक<br>जिल्हा न्यायालय<br>रायगड-अलिबाग |
|---|---|---|

---

वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीर नोटीस

**अर्जदारातर्फे ॲड.संगमत सावंत**
दिवाणी अ १५० म

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.श्रीमती.मुजावर साहेब, सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.३७१/२०१९
नि.नं.८/ड
ने.ता.२१/१०/२०२२

ज्यापेक्षा सुरेन्द्रनाथ रामचंद्र सिंग, शहर खरतूम, देश-सुडान येथे दि.३०/१२/२०१५ रोजी निधन झाले आणि १) श्री.राजीव कुमार सुरेंद्र सिंह, २) श्री.संजय सिंग सुरेन्द्र सिंग व ३) श्रीमती. कलावती सुरेन्द्र सिंग सर्व रा.सत्य सिद्धी सोसायटी, रुम नं.-ए-४०१, प्लॉट नं.१९, सेक्टर नं.११, कळंबोली, कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांनी या कोर्टास सदरहू मयत सुरेन्द्रनाथ रामचंद्र सिंग, यांचे मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकत होती असे कळविले आहे.

मिळकतीचे वर्णन

सदनिका क्र.सत्य सिद्धी सोसायटी, रुम नं.-ए-४०१, प्लॉट नं.१९, सेक्टर नं.११, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ क्षेत्रफळ ३७.९९ चौ.मी.

वरील मिळकत मयत सुरेन्द्रनाथ रामचंद्र सिंग यांनी में शिवम इन्टरप्रायझेस यांसकडून दि.०४/०२/२००५ रोजी रजिस्टर्ड ॲग्रीमेंट फॉर सेल या करारनाम्याद्वारे खरेदी केली आहे व दुय्यम सह निबंधक उरण येथे दि.०४/०२/२००५ रोजी रजिस्टर्ड केले व दस्तऐवज नांदणी क्र.०१२५५/२००५ आहे. सदर मिळकत मयत सुरेन्द्रनाथ रामचंद्र सिंग यांचे नावे आहे.

याबाबत सुरेन्द्रनाथ रामचंद्र सिंग यांचे वारस असल्याचे सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवावे आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत सुरेन्द्रनाथ रामचंद्र सिंग यांचे अर्जदारांना हे वारस असल्याचे सर्टीफिकेट देईल.

आज दि.१७ माहे ९/२०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

